ePaper

राज्यपालांचा राजीनामा मंजूर, अद्याप माफी मागितली नाही: सुषमा अंधारे



| वर्ष - 6 | अंक - 298 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- शेतकऱ्याचा प्रवास अल्पभूधारक
- विकासकामांमुळेच अश्विनी जगतापांचा विजय निश्चित!
- कोश्यारींना अखेर निरोप

www.mahaenews.com | सोमवार , दि. 13 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# कलाटे, वाकडकरांच्या हाती 'कमळ'!

## » 'होम पिच' वर कलाटेंना आव्हान : अश्विनी लक्ष्मण जगताप यांची प्रचारात आघाडी

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**भाजप आणि महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारासाठी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे बंधू विजय जगताप यांनी रविवारी वाकड परिसरात घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधला. या भागात राहणाऱ्या कलाटे आणि वाकडकर कुटुंबांनी आम्ही लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले. तसेच वाकडची जनता 'कमळ'च्या चिन्हावर मतदान करून अश्विनी लक्ष्मण जगताप यांना एक लाखांच्या मताधिक्याने विजयी करणार असा विश्वास व्यक्त केला. वाकड भागातील कलाटे आणि वाकडकर कुटुंबियांनी 'कमळ' आणि जगताप कुटुंबियांना साथ देण्याचा निर्णय घेतल्यामुळे अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना 'होम पिंच'वर आव्हान निर्माण झाले आहे.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय आठवले गट, राष्ट्रीय समाज पक्ष, शिवसंग्राम, रयत क्रांती व प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. संपूर्ण जगताप कुटुंब सुद्धा प्रचारात उतरले आहे. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे बंधू विजय जगताप यांनी रविवारी वाकड भागात घरोघरी नागरिकांशी संवाद साधला. या भागातील सर्व नागरिकांना भाजपाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारपत्रकाचे वाटप केले.

विशाल आप्पा कलाटे, रामभाऊ वाकडकर, संतोष दादा कलाटे, भारतीताई विनोदे, अमर भूमकर, गणेश आल्हाट, श्रीनिवास कलाटे, अमोल कलाटे, विक्रम कलाटे, प्रदीप कलाटे, संजय भुजबळ, राजेंद्र विनोदे, कुणाल वाव्हळकर, बजरंग कलाटे, कालिदास कलाटे, सुदेश राजे, विक्रम कलाटे, दिलीप भूमकर, संतोष बिनगुडे, नितीन केमसे, प्रमोद भुजबळ, सुरज भुजबळ, सन्नी भुजबळ यांनी वाकड आणि परिसरात जोरदार प्रचार सुरू केला आहे.

### वाकडच्या विकासात जगताप यांचा मोठा वाटा...

»त्यांच्या या प्रचारात वाकड भागातील कलाटे आणि वाकडकर कुटुंबांनी साथ दिली. वाकडच्या विकासात दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचाच मोठा वाटा आहे. अन्य कोणी कितीही बढाया मारल्या तरी लक्ष्मणभाऊ जगताप यांनीच वाकडचा कायापालट केला. आज या भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यामध्ये लक्ष्मणभाऊ जगताप यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे येथील कलाटे आणि वाकडकर कुटुंबिय पोटनिवडणुकीत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी दिला. वाकडची जनता अश्विनी लक्ष्मण जगताप यांना एक लाखाच्या मताधिक्याने निवडून देणार असल्याचाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# चिंचवड विधानसभेसाठी युवक राष्ट्रवादी मैदानात!

## » अडीचशे युवकांची पदनियुक्ती : युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांचे शक्तिप्रदर्शन

। पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी आज मोठे शक्तीप्रदर्शन करत तब्बल 250 कार्यकर्त्यांची युवकच्या कार्यकारणीवर नियुक्ती केली. थेरगाव येथील संतोष मंगल कार्यालय येथे आज राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. त्यामुळे चिंचवड विधानसभा जिंकायचीच या इराध्याचे युवकची फळी मैदानात उतरल्याचे स्पष्ट झाले आहे.** युवकचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरज चव्हाण, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला अध्यक्षा कविता अल्हाट, प्रवक्ते रविकांजी वरपे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

चिंचवड विधानसभेच्या अध्यक्षपदाची धुरा उमेश काटे यांच्याकडे देण्यात आली असून उपाध्यक्षपदी सनी माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहर सरचिटणीसपदाची संधी विकास कांबळे यांना तर चिंचवड विधानसभेच्या मुख्य संघटकपदी आकाश घोलप तर सरचिटणीसपदी प्रशांत कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रमुख नियुक्त्यांसह 14 प्रभाग अध्यक्ष, 42 वॉर्डाध्यक्षांची नियुक्ती करतानाच उपाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव या पदांवर 200 हून अधिक कार्यकर्त्यांना इम्रान शेख यांनी संधी दिली आहे.

या पदनियुक्ती सोहळ्याचे आयोजन कार्याध्यक्ष निलेश निकाळजे, मनोज जरे, उपाध्यक्ष ओम शिरसागर, दिनेश पटेल, साहिल शिंदे, रुबान शेख, केतन होके, मेघराज लोखंडे, ऋतिक भुजबळ, साहिल शिंदे, अभिषेक जगताप याधिकाऱ्यांनी केले होते.

### युवकांवर मोठी जबाबदारी - पाटील

»कोणत्याही निवडणुकीमध्ये विजय मिळवायचा असेल तर युवकांची ताकद महत्त्वाची असते. चिंचवडचा विजय मिळविण्यासाठी युवकांवर मोठी जबाबदारी असून ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्याचे काम युवकची कार्यकारणी करत असल्याचे मत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावेळी व्यक्त केले. चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक युवकांनी आपल्या खांद्यावर घेतल्याने येथील विजय निश्चित असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

> **चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीमध्ये राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने शहरातील असंघटित, बेरोजगार, बहुजन, सुशिक्षित तरुणांना एकत्रित करून महविकास विकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांना भरघोस मतांनी विजयी करण्यासाठी युवकची कार्यकारणी कामाला लागली आहे. त्यामुळे काटे यांचा विजय निश्चित आहे.**
>
> **- इम्रान शेख, शहराध्यक्ष.**

# शेतकऱ्याचा प्रवास अल्पभूधारक!

## » अत्यल्प भूधारक ते भूमीहीन या दिशेने सुरू; अजित पवार यांची टीका

**। नारायणगाव ।**

**महाईन्यूज ।**

**सरकारने शेतीला आवश्यक असणारी खते ,वीज व पाणीपट्टीची भाव वाढ केली आहे. कांद्याला भाव नाही. साखर निर्यात बंदी केल्याने साखरेला भाव नाही. शेतकऱ्याचा फायदा होईल असा कोणताही निर्णय घेतला जात नाही.**

सहकार क्षेत्र अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्याचा प्रवास अल्पभूधारक , अत्यल्प भूधारक ते भूमीहीन या दिशेने सुरू आहे. भाजप सरकार शेतकरी विरोधी आहे.अशी टीका विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली.

येथील ग्रामोन्नती मंडळ संचलित श्रीमती एस. आर. केदारी बालकमंदिर, अण्णासाहेब नवरे तांत्रिक शिक्षण केंद्र व वारुळवाडी ग्रामपंचायतीच्या नुतन इमारतींचे उदघाटन व कृषी विज्ञान केंद्राच्या ग्रामोन्नती कृषी सन्मान २०२३ पुरस्कार वितरण, शिवजन्मभूमीची आम्रगाथा, आंबा उत्पादन मार्गदर्शिका पुस्तकाचे प्रकाशन, पोषण भाजीपाला उद्यानाचे उदघाटन विरोधी पक्षनेते अजित पवार,

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, माजी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले. या वेळी वास्तुविशारद अरविंद ब्रम्हे, स्वप्नील जुन्नरकर, सचिन घोडेकर यांचा सत्कार पवार यांच्या हस्ते करण्यात आला.त्या नंतर कृषी प्रदर्शनाचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या वेळी विरोधी पक्षनेते पवार यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी




विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर होते.

या वेळी आमदार आमदार अतुल बेनके, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे , संचालक संजय काळे, भिमाशंकरचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, विघ्नहरचे उपाध्यक्ष अशोक घोलप, सभापती देवदत्त निकम, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे,कार्यवाह रवींद्र पारगावकर ,

उपाध्यक्ष सुजित खैरे , डॉ.आनंद कुलकर्णी, संचालक रमेश जुन्नरकर, अरविंद मेहेर, शशिकांत वाजगे ,डॉ. संदीप डोळे , तानाजी वारुळे, डि.के.भुजबळ एकनाथ शेटे, रत्नदीप भरवीरकर, शरद लेंडे, रमेश भुजबळ, राजश्री बोरकर आदी उपस्थित होते.

विरोधी पक्षनेते पवार म्हणाले लोकसंख्या वाढत आहे, शेतीचे क्षेत्र रस्ते, उद्योग, धरणे यामुळे कमी होत आहे. जमीन वाटपामुळे शेतकऱ्याचा प्रवास अल्पभूधारक,अत्यल्प भूधारक ते भूमीहीन या दिशेने सुरू आहे.

शेतीला पुढील काळात महत्व वाढणार आहे. कमी वेळेत, कमी पाण्यात येणाऱ्या, रोगाला बळी न पडणाऱ्या पिकांच्या जातीचे संशोधन करणे आवश्यक आहे. आधुनिक पद्धतीने शेती करा. माती परीक्षण करा.रासायनिक खतांचा वापर कमी करून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.विषमुक्त भाजीपाला फळे उत्पादनाकडे लक्ष द्या.

शेतमालाचे पॅकिंग चांगले करून मार्केटिंग व्यवस्थित करा.शेती व्यवसाय शाश्वत होण्यासाठी शेतीपूरक व्यवसाय करा. शेतमजूरा अभावी ऊस तोडणीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शेतमजुराच्या प्रश्नावर शेतकऱ्यांनी पर्याय शोधला पाहिजे. भविष्यात शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर करावाच लागेल.

माजी मंत्री छगन भुजबळ म्हणाले ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील शैक्षणिक संस्थेची नेत्रदीपक प्रगती झाली आहे.संचालक मंडळ निस्वार्थी भावनेने काम करत असल्याने हे शक्य झाले आहे.

---

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार म्हणजे आजारापेक्षा इलाज भयंकर!'

## » जलवाहिन्या फुटल्याने नागरिक संतापले

**।किरकटवाडी ।**

**महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**अगोदरच अत्यंत खराब झालेल्या रस्त्यामुळे हैराण झालेले खडकवासला येथील नागरिक आता रस्त्याचे काम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे वैतागले आहेत. रस्त्याचे खोदकाम करताना मुख्य जलवाहिनीसह इतर काही रहिवाशांच्या जलवाहिन्या फुटल्याने नागरिक संतापले असून सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार म्हणजे 'आजारापेक्षा इलाज भयंकर' असा अनुभव नागरिक सध्या घेत आहेत.**



अनेक वर्षांपासून रखडलेले खडकवासला गावच्या हद्दीतील सिंहगड रस्त्याचे काम अखेर ठेकेदार बदलून सार्वजनिक बांधकाम विभागाने पुन्हा सुरू केले खरे परंतु नागरिकांना मात्र दिलासा मिळण्याऐवजी अद्यापही त्रासच सहन करावा लागत आहे. मागील आठवड्यापासून गावातील रस्त्याच्या एका बाजूने खोदकाम सुरू असून त्याचा वेगही अत्यंत संथ आहे.

त्यातच खोदकाम करताना जलवाहिन्या फुटल्याने आता नागरिकांना पाण्याचीही गैरसोय सहन करावी लागत आहे. खोदकाम करताना जलवाहिन्या फुटल्यानंतर तातडीने दुरुस्तीसाठी कोणतीही उपाययोजना सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली नसल्याने नियोजनशून्य कारभाराबाबत नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

> **"खोदकाम करताना कसलेही नियोजन करण्यात आलेले नाही. मुख्य जलवाहिनीसह इतर अनेकांच्या पाण्याचे कनेक्शन तुटले परंतु दुरुस्ती करण्यात आली नाही. परिणामी आम्हाला आज पाणी आले नाही व उद्याचेही काही सांगता येत नाही."**
>
> **- मिना रोहिदास मते, गृहिणी, खडकवासला**

> **"जागतिक विक्रमामध्ये नोंद व्हावी अशा पद्धतीने या रस्त्याचे काम सुरू आहे. अधिकाऱ्यांनी स्थानिक रहिवासी, पर्यटक यांची गैरसोय समजून घ्यायला हवी परंतु प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. यापुढे तरी खोदकाम करताना जलवाहिन्या किंवा वीज वाहिन्या तुटण्याची शक्यता लक्षात घेऊन त्याप्रमाणे तातडीने दुरुस्तीची व्यवस्था करण्यात यावी."**
>
> **- विजय मते, नागरिक, खडकवासला**

> **"संबंधित जलवाहिन्या तातडीने दुरुस्त करून घेण्यास सांगितले आहे. ठेकेदारासही लवकरात लवकर काम पूर्ण करुन घेण्यास सांगितले आहे."**
>
> **- ज्ञानेश्वर राठोड, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

---

## शॉर्ट न्यूज

### रास्ता पेठेत तीन दुकाने फोडली; पावणे दोन लाखांची रोकड लंपास




**पुणे** - पुण्यातील रास्ता पेठ परिसरात तीन दुकाने फोडल्याची घटना घडली आहे. चोरट्यांनी एक लाख ८४ हजारांची रोकड लांबवली आहे. रास्ता पेठेतील माळी महाराज मंदिर रस्त्यावर शामियाना कॉम्प्लेक्स सोसायटीत गणक एनएक्स गृहोपयोगी वस्तुचे दुकान आहे. या दुकानाचे कुलुप तोडून चोरट्यांनी एक लाख ७४ हजारांची रोकड लांबविली. याच परिसरातील किशोर खीमशेरा यांच्या सॅनिटरी वेअर दुकानाचे कुलुप तोडून चोरट्यांनी एक लाख ६०० रुपयांची रोकड चोरुन नेली. महेंद्र माली यांच्या आईस्क्रीम दुकानातून सहा हजारांची रोकड चोरट्यांनी लांबविली. सहायक पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

## 2019 च्या निवडणुकीतील सव्वा लाख मते कुणाची

# कलाटेंची की महाविकास आघाडीची?

## » चिंचवड पोटनिवडणूक : अडीच वर्षांत ‘त्या’ मतदारांना काय मिळाले?

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील राजकारणाची दिशा बदलणारी चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध भाजपा+ बाळासाहेबांची शिवसेना महायुती अशी लढत होईल, असे अपेक्षीत असतानाच राहुल कलाटे यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्धार केला. त्यामुळे तिरंगी लढत होणार हे निश्चित झाले. मात्र, २०१९ मध्ये अपक्ष उमेदवार राहिलेल्या कलाटे यांना मिळालेली सव्वा लाख मते आता कुणाच्या पारड्यात पडणार? अशी चर्चा ‘ग्राऊंड लेव्हल’ला जोर धरु लागली आहे.**

२००९ साली दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी या मतदार संघातून अपक्ष उमेदवारी लढवली. काँग्रेसच्या तिकीटावर लढलेल्या भाऊसाहेब भोईर यांचा त्यांनी पराभव केला होता. त्यावेळी अपक्ष असलेल्या जगतापांच्या पाठिशी राष्ट्रवादी काँग्रेसची अप्रत्यक्ष ताकद होती, असे भाऊसाहेब स्वत: जाहीरपणे सांगतात. त्यावेळी जगताप यांना ७८ हजार ७४१ इतकी मते मिळाली. शिवसेनेचे उमेदवार असलेले श्रीरंग बारणे यांना ७२ हजार १६६ मते आणि काँग्रेसच्या तिकीटावर लढलेले भाऊसाहेब भोईर यांना २४ हजार ६८४ मते मिळालेली आहेत. त्यावेळी विलास नांदगुडे यांचाही प्रचार जोरात होता. त्यांनी अपक्ष १५ हजार ५६१ मते घेतली होती. २०१४ मध्ये लक्ष्मण जगताप यांनी राष्ट्रवादीच्या तिकीटावर निवडणूक लढवली.

त्यावेळी राहुल कलाटे यांची विधानसभा निवडणुकीत ‘एन्ट्री’ झाली. शिवसेनेच्या चिन्हावर (धनुष्यबाण) लढलेल्या कलाटे यांना त्यावेळी ६३ हजार ४८९ मते मिळाली आहेत. ही आकडेवारी एकूण मतदानाच्या २३. २९ टक्के इतकी आहे. तिसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या विठ्ठल उर्फ नाना काटे यांना त्यावेळी ४२ हजार ५५३ मते अर्थात एकूण मतदानापैकी १५. ६१ टक्के मते मिळाल्याची आकडेवारीत स्पष्ट आहे. त्यावेळी राष्ट्रवादीतून बंडखोरी केलेले मोरेश्वर भोंडवे यांना १३ हजार ९५२ आणि काँग्रेसचे ८ हजार ६४३ मते पडली आहेत. मनसे पक्षाकडून लढलेले अनंत कोऱ्हाळे यांना ८ हजार २१७ मते मिळाली होती. त्यावेळी एकूण मतदानापैकी ५६ टक्के म्हणजे २ लाख ७२ हजार ५५७ मतदान झाले. यापैकी तब्बल १ लाख २३ हजार ७८६ मतदार दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी घेतले होते.

विशेष म्हणजे, लक्ष्मण जगताप २०१४ मध्ये भाजपाच्या ‘कमळ’ चिन्हावर लढले होते. दरम्यान, महाविकास आघाडीची खरी रंगीत तालीम २०१९ च्या चिंचवड विधानसभा निवडणुकीत झाली. यावेळी अपक्ष उमेदवार असलेल्या राहुल कलाटे यांना राष्ट्रवादी, शिवसेना, वंचित आणि काँग्रेससह विविध पक्षांनी पाठिंबा दिला. या निवडणुकीत भाजपाच्या तिकीटावर लक्ष्मण जगताप यांना १ लाख ५० हजार ७२३ मते मिळालेली आहेत. तर अपक्ष राहुल कलाटे यांना १ लाख १२ हजार २२५ मते आहेत. एकूण पडलेल्या मतांपैकी ५४ टक्के मते जगताप यांच्याकडे आणि ४० टक्के मते कलाटेंच्या वाट्याला आली होती.

त्यामुळे भाजपाविरोधी सर्व मते कलाटेंच्या पारड्यात पडल्याने कलाटे यांचे राजकीय वजत शहराच्या राजकारणात कमालीचे वाढले होते. परिणामी, आताच्या पोटनिवडणुकीत भाजपाविरोधात कलाटे यांना पडलेली सव्वा लाख मते कुणाच्या पारड्यात पडणार? यावर चिंचवडचा भावी आमदार कोण? हे ठरणार आहे.

### अडीच वर्षांत कलाटेंनी ‘व्होट बँक’ सांभाळली नाही...

» “सव्वा लाख मतांचा धनी आणि जनतेच्या मनातील आमदार” असे ब्रँडिंग करण्यात सुरूवातीला राहुल कलाटे यशस्वी झाले. मात्र, नंतरच्या काळात कलाटे केवळ वाकड आणि त्यांच्या प्रभागापुरते मर्यादित राहीले. महाविकास आघाडीची सत्ता असताना राहुल कलाटे यांचा महापालिका प्रशासनावर प्रचंड वचक होता. मात्र, त्याकाळात “नरो वा कुंजरो वा” अशा भूमिकेत राहीले. चिंचवड विधानसभा मतदार संघात मोठी संधी असतानाही कलाटेंनी त्याकडे दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे, कधी राष्ट्रवादी, कधी शिवसेना तर कधी स्वतंत्र अशी धरसोड राजकीय भूमिका ठेवल्यामुळेच महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने या जागेवर दावा केला. किंबहूना, राहुल कलाटे नकोच... अशा भूमिकेतून पोटनिवडणूक जाहीर झाल्यापासून राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी पक्षश्रेष्ठींकडे तगादा लावला. शेवटच्या क्षणापर्यंत महाविकास आघाडीची उमेदवारी राहुल कलाटे यांना मिळेल असे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. आज एकाकीपणे लढा उभारावा लागला, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### राहुल कलाटे यांच्या वाट्याला 25 ते 30 हजार मते?

**» प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपाविरोधी मते महाविकास आघाडीची आहेत. त्याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत आला. आम्ही तीन पक्ष एकत्र आलो तर भाजपाला सहज पराभूत करु शकतो, असा दावा केला. आमदार सुनील शेळके यांनी तर, राहुल कलाटे यांच्या मागे कोणीही नाही, असे जाहीर करुन टाकले. दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने “आमचा उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे आहेत. बंडखोरांवरवर कारवाई करण्यात येईल,” असे सांगण्यात आले. २०१९ मध्ये राहुल कलाटे यांना पडलेल्या सव्वा लाख मतांमध्ये राष्ट्रवादीची किमान ४० हजार मते आहेत. तसेच, शिवसेनेची किमान ५० हजार मते आहेत. उर्वरित २२ ते २५ हजार मते राहुल कलाटे यांना मानणारी आहेत.**

# विकासकामांमुळेच अश्विनी जगतापांचा विजय निश्चित!

## »चंद्रकांत पाटील : चिंचवडचा मतदार जगतापांच्या पाठिशी

।पिंपरी चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले. पेट्रोल-डिझेलचा व्हॅट रद्द केला. सात लाखांपर्यंत उत्पन्न करमुक्त केले. सरकारी योजनेतून ३०० चौरस फुटाचे घर देण्याची घोषणा केली. दिलासा मिळतो तेव्हा कोणीही “मोदीजी जिंदाबादच” म्हणतो. चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनीही दूरदृष्टी ठेवून चिंचवड मतदारसंघात विकासकामे केली. त्यातून संपूर्ण शहरातील नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय बदल झाला. हा बदल जनतेला कळतो. भाऊंनी केलेल्या विकासकामांमुळेच ही जनता पोटनिवडणुकीत अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करणार याची मला पूर्ण खात्री असल्याचे पालकमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी (दि. १२) सांगितले.**

चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय आठवले गट, राष्ट्रीय समाज पक्ष, शिवसंग्राम, रयत क्रांती व प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचार कार्यालयाचे काळेवाडी, तापकीरनगर येथे चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे,



माजी महापौर माई ढोरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, आरपीआय आठवले गटाचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे, रासपचे शहराध्यक्ष भरत महानवर, प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष विनोद गायकवाड, लोकजनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष संजय आल्हाट, हरेश तापकीर यांच्यासह भाजप व मित्रपक्षाचे माजी नगरसेवक, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आमदार जगतापांनी विकासकामाचा डोंगर उभा केला...

» स्वच्छ अभियानामुळे घरापासून ते गावकुसापर्यंत शौचालये उभारली गेली. महाराष्ट्रात पेट्रोल व डिझेलवरील व्हॅट रद्द केला. आमच्या सरकारने एसटीमध्ये ७५ वर्षांपुढील ज्येष्ठांना मोफत प्रवासाचा निर्णय घेतला. ठाकरे सरकारने बंद केलेली मुख्यमंत्री आरोग्य सहाय्य योजना सुधारित केली. मतदार कामे करणाऱ्या सरकारच्या बाजूने उभे राहणार आहेत. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनीही चिंचवड मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. त्यांनी दूरदृष्टी ठेवून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. त्यामध्ये त्यांच्या कुटुंबाचेही योगदान आहे, असेही चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.

> “देशात भाजपाची सत्ता आल्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या प्रमाणात विकास केला. अनेक सुविधा निर्माण केल्या. देशभर रस्त्यांचे जाळे विणले. दळणवळणाच्या सुविधा निर्माण झाल्याने देशाची प्रगती वेगाने होत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात पंतप्रधान मोदी यांनी सात लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून सामान्यांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी तीनशे चौरस फुटाचे घर सरकारी योजनेतून मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.
>
> - **चंद्रकांत पाटील,** पालकमंत्री

## संपादकीय »

# तर्काच्या गंजलेल्या चाळण्या...

***जन्मतः प्रत्येक मनुष्याला निसर्गाने मेंदू प्रदान केलेला असतो. गरीब,श्रीमंत किंवा जात.धर्म बघून जगात कधीच कुणाचा मेंदू ,बुद्धी कमीजास्त नसते.***

निसर्ग कुणाचाही वशिला मान्य करीत नाही ,सर्वांना सर्वकाही सारखेच वाटप करीत असतो. पुढे त्याचा वापर आणि विकास जसा होतो तशी व्यक्ती घडत जाते. स्थान,काळ आणि सामाजिक परिपोषण यात मोलाची भूमिका बजेट असते. आपल्या जीवनात किंवा भवताल घडणाऱ्या घटना चांगल्या की वाईट हे ठरवणारी तर्काची चाळणी प्रत्येकाच्या मेंदूत असते. त्याच्या आधारावरच मानवी जीवन अवलंबून असते. मेंदूतील हा तर्काचा कप्पा क्रांतिकारी आणि बंडखोर असतो ,त्यामुळेच त्याचा वापर होऊ नये याचा आग्रह असणाऱ्या यंत्रणा आपल्या अवतीभोवती सतत कार्यरत असतात. स्वतःच्या मेंदूमधील तर्क वापरण्याची सवय संस्कार आणि घरातले वातावरण यावर अवलंबून असते ,ज्या घरात मुलांना त्याचा वापर करण्याची मुभा असते ती मुले पुढे स्वतंत्र विचारांचे नागरिक म्हणून उदयास येतात इतर सगळी प्रजा असते.

तर्क कुणाचेही वैचारिक नेतृत्व स्वीकारीत नाही. त्यामुळे मुलांनी आपली बुद्धी पाजळु नये असाच बहुतांश पालकांचा आग्रह असतो." मी सांगतो तेवढे कर,उगाच अक्कल पाजळु नकोस." अशी तंबीच देताना पालक आढळतात त्यामागे मुले हाताबाहेर जाऊ नये अशी भीती असते. बालवयात पालकांच्या प्रभावात येऊन मेंदूतील तर्क वापरणे बंद झाले की तसेच व्यक्तिमत्व घडत जाते. घरातील वडीलधारी मंडळी म्हणजे त्रिकालज्ञानी ,ते सांगतात तेच खरे हा संस्कार घट्ट होत जातो. पुढे शाळेत गुरुजन आणि समाजात गुरु शिवाय कुणाकडे ज्ञान असू शकत नाही यावर भरोसा पक्का होतो. बालपण,विद्यार्थी दशा आणि तारुण्य उलटून गेले आणि आपण प्रौढ झालो तरी मेंदूतील तर्क वापरण्याचे काम पडत नाही अशावेळी तर्काच्या चाळणीवर श्रद्धा,आस्था,भक्ती किंवा आज्ञाधारकपणाचा गंज चढलेला असतो. जेव्हा संभ्रम वाढेल तेव्हा कुणाचे तरी मार्गदर्शन घेऊन काम भागून जाण्यामुळे विचारशक्ती कमकुवत होते. खरे,खोटे जिथून ओळखले जाते त्या भागाचा दीर्घकाळ वापरच झाला नसल्याने त्यासाठी सुद्धा कुणाचा तरी आधार घेण्याची गरज निर्माण होते. तर्काचा आणि व्यक्तीच्या शिक्षणाचा काहीही संबंध असल्याचे समाजात आढळत नाही. परिणामी समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी मूर्ख बनणारे,चटकन फसणारे आणि कुणाच्याही नादी लागणाऱ्या शिक्षित समूहाचे प्रमाण अलीकडे वाढले आहे.




# तुमच्या मुलांना कोचिंगची खरंच गरज आहे काय?



गेल्या काही दशकांपासून जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाल्यामुळे प्रत्येकाचे जीवन व्यस्त आणि तणावयुक्त बनले आहे. नोकरी,रोजगाराचा अभाव आणि कुटुंबात वाढलेले सदस्य बघता संसाराचा गाडा ओढताना होणारी दमछाक लहान मोठ्या अशा सगळ्याच कुटुंब प्रमुखांना सतत कुठल्यातरी तणावात ठेवत असते. अशाकाळात शिक्षण क्षेत्राचे झालेले व्यापारीकरण त्याच्या जीवावर उठले आहे. पालिका आणि जिल्हा परिषदांच्या शाळा यावरचा विश्वास कधीच उडून गेल्यावर खासगी किंवा मिशनरी शाळा हाच एकमेव पर्याय त्याच्यापुढे उरल्याने मुलांचे शिक्षण सुद्धा कुणाचे कंबरडे मोडू शकते याचा अनुभव असा प्रत्येक कुटुंबप्रमुख सध्याच्या काळात घेत आहे. पालकांच्या नंतर किंवा त्यांच्याही पेक्षा अधिक शिक्षकांवर मुलांचा विश्वास वाढत असल्याने शाळेतील अभ्यासाच्या तुलनेत कोचिंगच्या अभ्यासाकडे मुलांना वळविण्यात शिक्षक यशस्वी झाले आहेत.

इयत्ता सात ते दहा या काळात मुलांचा कल शिक्षणापेक्षा खेळ,मस्ती किंवा इतर बाबींवर अधिक असतो त्यामुळे अभ्यासात एकाग्रता करावी लागते आणि पालकांना अपेक्षित असे ९० टक्के गुण मिळवावे लागतात याची कल्पना मुलांना नसते अशावेळी त्यांचे काही विषय कच्चे,कमजोर असण्याची अधिक शक्यता असते. हे विषय वर्गात त्या त्या विषयाच्या शिक्षकांनी मजबूत करवून घ्यायचे असतात ,त्यासाठी कमजोर विद्यार्थ्यांवर विशेष मेहनत घेत त्यांनाही सगळ्यांच्या बरोबर आणण्याचे कौशल्य विषय शिक्षकाला साधायचे असते. अलीकडे तसे होताना दिसत नाही कारण गणित,इंग्रजी किंवा विज्ञानाचे शिक्षक काही तास शाळेत आणि भरपूर तास स्वतःचे कोचिंग क्लास उघडून बसलेले आहेत. वर्गातील कच्चे दुवे त्यांचे हमखास ग्राहक झालेले असतात. त्यांच्या पालकांना बोलावून त्याला कशी कोचिंगची गरज आहे हे पटवून देण्यात शिक्षक तरबेज झाले आहेत.

बाप नोकरदार किंवा व्यावसायिक आणि जेमतेम शिकलेली गृहिणी आई गुरुजींच्या या समुपदेशनाने प्रभावित होऊन काटकसर करून मुलांना कोचिंग लावण्याची मानसिकता तयार करतात. तोवर इतर शाळकरी मित्रही कुठल्यातरी कोचिंग क्लासचे गोडवे मित्रांपुढे गात असतात ,या सगळ्यांचा प्रभाव पडून अखेर लाखांचे कोर्स पोटाला चिमटा घेत करण्याची तयारी करीत मुलांना कोचिंगची वाट धरावी लागते. कोचिंग क्लास संचालक मोठे हुशार असतात ,मुलांसोबत त्याच्या पालकांची परीक्षा घेण्यात त्यांनाही मोठा आनंद होतो . पालक आणि पाल्य दोघेही हुशार आहेत याची खात्री पटल्यावरच क्लासला प्रवेश मिळत असेल तर सामान्य वकूब असणारे पालक आणि पाल्य यांनी कुठे जावे ? याचे उत्तर अलीकडे नामवंत शाळा आणि कोचिंग क्लास मालकांच्या जवळ नाही. उत्तम प्रतिभेला थोडीफार कल्हई लावत तिला अधिक उजळून टाकण्याचे काम सध्या शिक्षण क्षेत्रात सुरु आहे.

कोणत्याही कोचिंग क्लासमध्ये असणाऱ्या हजार विद्यार्थ्यांपैकी बोटांवर मोजण्याएवढे विद्यार्थी भरारी मारतात कारण ते आधीच त्या योग्यतेचे असतात. त्या उंचीवर जाण्याच्या लालसेने ज्या पालकांनी पोटाला चिमटा घेऊन लाखांनी पैसे भरले त्यांच्या मुलांचे कोचिंग क्लासमध्ये पुढे काय होते,ते कधी कोणत्यातरी होर्डिंग्जवर तरी चमकतात काय याचा विचार केल्यास मोठा अपेक्षाभंग होतो. मुलांच्या हट्टापायी पालक पुढे त्या विषयावर बोलायला तयार होत नाहीत. लाखभर रुपये पाण्यात जातात आणि हातात अपेक्षित यशही मिळत नाही. एका विशिष्ट काळात गुणवंतांचे सर्वत्र कौतुक होते, सामान्य विद्यार्थी त्याच पायरीवर बसून भरारी मारणाऱ्या मित्रांचे कोतुक करतात अन पालक तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत असतात. त्यामुळे तुमच्या मुलांना खरंच कोचिंग लावण्याची गरज आहे काय ? हे गंभीरतेने तपासून बघण्याची गरज आहे. डोळे दिपवून टाकणारे क्लासचे बाह्य स्वरूप आणि चक्रावून टाकणाऱ्या पानभर जाहिराती बघून मुले आकर्षित होतात, क्लासमध्ये मुले कोंबल्यावर सब घोडे बारा टक्के असतात. अल्प वेतनात कुणीतरी गरजू त्यांना शिकवतो आणि वर्षातून ठराविक वेळा क्लासचे सेलिब्रिटी संचालक कानात लेपल माईक अडकवून सुटाबुटात त्यांना मार्गदर्शन करून झलक दाखवून निघून जातात. अपवाद वगळता सगळ्याच क्लासमध्ये असेच चालत असेल तर आपल्या घामाचा पैसा नेमका कशावर उधळला जातोय याची पालकांनी पडताळणी नक्कीच करायला हवी.

# कामाच्या मोबदल्याचे काय?

**परफॉर्मन्स अप्रेझल’दरम्यान आस्थापनेतील वातावरण आणि धोरणांचा स्त्रियांच्या ‘अप्रेझल’वर परिणाम होत असेल, तर त्याविषयी त्यांनी एकत्र येऊन वरिष्ठांसमोर आपले म्हणणे मांडले पाहिजे. भीती, संकोच, नोकरीवर गदा येण्याची किंवा इतरांचा रोष ओढवून घेण्याची शक्यता अशा साऱ्या आव्हानात्मक पैलूंचा विचार झाला पाहिजे. एकजुटीने आस्थापनेतील वातावरण आणि धोरण समानता याकडे वरिष्ठांचे लक्ष वेधले पाहिजे.**

दरवर्षी फेब्रुवारी-मार्च महिन्यात दहावी-बारावीच्या परीक्षांचे वारे वाहू लागतात. वर्षभर केलेला अभ्यास आता काही तासांच्या प्रश्नपत्रिकेत जोखला जाणार असतो. दहावी, बारावी, पदवी असे शिक्षणाचे टप्पे पार करून नोकरी आणि मग तिथेही दरवर्षी होणारे ‘परफॉर्मन्स अप्रेझल,’ अप्रेझल म्हणजे मूल्यमापन. वर्षभरात काय केले त्याचे मूल्यमापन ज्यावर नोकरी, तिथे मिळणारी बढती, पगारवाढ, जबाबदारी अवलंबून असते.

कामाच्या ठिकाणी अप्रेझलचे वारे वाहू लागले, की कुठे अस्वस्थता, तर कुठे आत्मविश्वास असे चित्र दिसते. स्वत:च्या कामाचा स्वत: घेतलेला आढावा, अर्थात ‘सेल्फ अप्रेझल’ने अनेक आस्थापनांमध्ये ‘अप्रेझल’ची सुरुवात होते आणि मग वरिष्ठांकडून मूल्यमापन, काही ठिकाणी सहकर्मचाऱ्यांकडून मूल्यमापन असाही प्रघात असतो. मॅनेजमेंटमध्ये ‘परफॉर्मन्स अप्रेझल’चे अनेक प्रकार आहेत, उदा.,



सेल्फ असेसमेंट, पीअर रिव्ह्यू, ३६० डिग्री अप्रेझल, कस्टमर/ क्लाएंट रिव्ह्यू इत्यादी. ‘अप्रेझल’च्या निमित्ताने ऑफिसमध्ये होणारी चलबिचल, वरिष्ठ आणि त्यांच्या मर्जीतले, काठावरचे आणि नावडते असेही कंगोरे त्यामागे असतात. सहसा वस्तुनिष्ठरित्या व्हावे अशी अपेक्षा असली, तरी ‘परफॉर्मन्स अप्रेझल’च्या पार्श्वभूमीवर काही पूर्वग्रह ढळढळीतपणे पुढे येतात आणि ते पूर्वग्रह विशेषत: स्त्रियांना मारक असतात.

नेतृत्वगुण नव्हे, तर स्त्रिया टीमवर्क चांगले करतात, असा एक ठळक पूर्वग्रह. जोखमीचे किंवा क्लिष्ट काम करायचे असल्यास पुरुषांना ते सहज शक्य आहे, असे आजही समजले जाते. पुरुषांवर वेळेचे, घरच्या जबाबदाऱ्यांचे बंधन नसते, ते एकटे फिरू शकतात, त्यांना स्वत:च्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वत: घेता येते, असे सारे विचार या पूर्वग्रहांमागे असतात. हो, सामाजिक परिस्थिती आणि कौटुंबिक परिस्थितीचा साक्षेपी विचार केल्यास सुरक्षितता आणि घरच्या जबाबदाऱ्या या नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या बाजूच्या लंगड्या बाबी; पण तरीही सरसकट साऱ्या स्त्रिया अशाच परिस्थितीत असतील, हा पूर्वग्रह आणि म्हणून स्त्रियांना दुय्यम जबाबदारी देऊन टीममध्ये काम करण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध होत नाही. जिथे स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न येतो, तिथे ती जबाबदारी आस्थापनाने घेणे आणि स्त्रियांनीही आज हाताशी असलेल्या टेक्नॉलॉजी, ॲप्सचा उपयोग करून स्वत:ला सुरक्षित ठेवणे या पर्यायांना स्वीकारले पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥१॥
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कोश्यारींना अखेर निरोप!

## रमेश बैस यांची नियुक्ती करण्यात येणार

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**"राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्विकारला आहे. त्यांच्या जागी आता नव्या राज्यपालांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

कोश्यारी यांच्या जागी रमेश बैस यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. बैस हे महाराष्ट्राचे 20 वे राज्यपाल आहेत. वारंवार केल्या जाणाऱ्या वादग्रस्त वक्तव्यांनंतर कोश्यारी यांना मोठा विरोध झाला होता. गेल्या अनेक दिवसांपासून विरोधी पक्षांनी राज्यपाल कोश्यारी यांच्या विरोधात आवाज उठवला होता. राज्यपालांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांनी केली होती. अखेर कोश्यारी यांनी राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांनी पत्र लिहिले होते. अखेर आज कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. आज एकूण 13 नवीन राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती भवनाकडून करण्यात आली आहे.

"महाराष्ट्रासारख्या संत, समाजसुधारक आणि शूरवीरांच्या महान भूमीचा राज्यसेवक, राज्यपाल होण्याचा बहुमान मिळणे हे माझ्याकरिता अहोभाग्य होते. गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ राज्यातील जनसामान्यांकडून मिळालेले प्रेम आणि आपुलकी कधीही विसरता येणार नाही. माननीय पंतप्रधानांचा विशेष स्नेह आपणास नेहमीच लाभत आला आहे, आणि आशा आहे की या संदर्भात देखील मला त्यांचा आशिर्वाद मिळत राहील," असे राज्यपाल कोश्यारी यांनी आपल्या मनोगतामध्ये म्हटले होते.

> माझ्या मते महाराष्ट्राची सुटका झाली. अतिशय चांगला निर्णय. हा निर्णय आधीच घ्यायला हवा होता. महाराष्ट्राच्या इतिहासात अशी व्यक्ती कधीही राज्यपाल म्हणून झाली होती, ती आपण पाहिली. केंद्र सरकार आणि राष्ट्रपतींनी त्यात बदल केला, ही समाधानकारक बाब आहे.
>
> – शरद पवार, राष्ट्रवादी अध्यक्ष



### रमेश बैस यांना निष्ठेचे फळ

**मोदींच्या भाजपमध्ये वाजपेयीकालीन भाजपा नेते केंद्रीय वर्तुळातून बाहेर फेकले गेले, त्यापैकी रमेश बैसही होते. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना मोदी-शहांनी उमेदवारी दिली नाही. पण, बैस हे जुन्या पठडीतील नेते. पक्षाने अपेक्षाभंग केला तरी, पक्षाची शिस्त पाळली पाहिजे असे मानणाऱ्या नेत्यांपैकी बैस असल्याने त्यांनी अधिकृत उमेदवाराचा प्रचार केला. मोदी-शहांबद्दल नाराजी व्यक्त न करण्याचे फळ बैस यांना मिळाले. सक्रिय राजकारणातून त्यांना भाजपाने निवृत्त केले, तरी त्रिपुरासारख्या ईशान्येकडील भाजपासाठी महत्त्वाच्या राज्यामध्ये बैस यांची राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली. मग, त्यांना जुलै 2021 मध्ये झारखंडचे राज्यपाल केले गेले. आता त्यांना महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याच्या राज्यपाल पदी नियुक्त करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणामुळे शिंदे-फडणवीस सरकारला अपेक्षित स्थैर्य लाभलेले नाही. अशा वेळी बैस यांच्यावर महाराष्ट्राची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महाराष्ट्रातील बैस यांची नियुक्ती मोदी-शहांचा त्यांच्यावरील विश्वास स्पष्ट करते!**

# लवकरच पोहरागडावर रेल्वे लाईन!

## फडणवीसांची मोठी घोषणा, बंजारा समाजाला दिलं आश्वासन

। अमरावती । महाईन्यूज ।

**संतश्री सेवालाल महाराजांच्या जयंतीचं औचित्य साधून आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोहरागडावर दाखल झाले होते. यावेळी फडणवीसांनी बंजारा समाजासाठी अनेक घोषणा केल्या. यामध्ये रेल्वेलाईन बाबत फडणवीसांनी बंजारा समाजाला आश्वासन दिलं आहे.**



वर्धा-नांदेड रेल्वे रूट पोहरागडावरून गेला पाहिजे. ही मागणी मोदीजींनी मान्य केली होती. त्यासाठी या बजेटमध्ये मोदीजींनी पोहरागड रेल्वे रुटसाठी ५०० कोटी रुपये दिले आहेत. त्यामुळे लवकरच पोहरागडमध्ये रेल्वेलाईन येईल.

फडणवीस पुढं म्हणाले की, महाराष्ट्र सरकारच्या वतीने अडीचशे कोटी रुपयांचा रस्ता आपण तयार करत आहोत. ज्यामुळे भक्तांना त्रास सहन करावा लागणार नाही. मोदीजींच्या सरकारने बंजारा समाज आणि भटक्या विमुक्तांकरता एक नवीन महामंडळ सुरू केलं आहे. त्यामुळे बंजारा समाजाचा विकास होणार आहे. त्याचवेळी आपण मागणी केली की, महाराष्ट्र सरकारने देखील महामंडळाला अधिकचा निधी द्यायला हवा. त्याची काळजी करू नका. मुख्यमंत्र्यांनी तिजोरीच्या चाव्या दिल्या आहेत. ही तिजोरी महामंडळासाठी रिकामी करण्याचं काम आपण करू, असंही फडणवीस यांनी नमूद केलं.

बंजारा समाज ही आपली संस्कृती आहे. बंजारा समाजाची गोर बोली आहे. यासाठी मागच्या काळात आपल्याला अकॅडमी सुरू करायची होती. मात्र आपलं सरकार गेलं होतं. आता आपलं सरकार आलं आहे. या गोर बोलीचं संवर्धन करण्याचं काम आपलं सरकार नक्की करेल, असंही फडणवीस म्हणाले.फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# कोश्यारींचा राजीनामा 'आजच' स्विकारण्यामागे राजकीय खेळी?

## शिवसेना, घटनाबाह्य कामे अन् सुप्रीम कोर्ट

। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्विकारला आहे. रमेश बैस हे महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून पदभार स्विकारतील. कोश्यारी यांनी बऱ्याच दिवसांपूर्वी 'मला या जबाबदारीतून मुक्त करा' असं पत्र पंतप्रधानांना लिहिलं होतं. पण त्यांचा राजीनामा आजच स्विकारण्यामागे राजकीय खेळी असू शकतात का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेशी विधानपरिषदेच्या निवडणुकींनंतर बंड केले होते. त्यानंतर शिवसेनेनी बंड केलेल्या १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. मात्र, हे प्रकरण प्रलंबित असतानाच भगतसिंग कोश्यारी यांनी भाजप-शिंदे गट युतीच्या सरकार स्थापनेला मान्यता दिली. शिवसेनेने अपात्रतेबाबत दाखल केलेल्या याचिकेत एकनाथ शिंदे यांचेसुद्धा नाव होते तरीसुद्धा कोश्यारी यांनी शिंदेंना मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. त्याचबरोबर नवीन सरकार स्थापन करताना आणि शपथ देताना कोश्यारींनी तत्कालीन विधानसभा अध्यक्ष असलेल्या नरहरी झिरवळ यांचा सल्लासुद्धा घेतला नसल्याच्या चर्चा होत्या त्यामुळे राज्यपालांच्या भूमिकेवर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.



# ‘काँग्रेस पक्षाचा टिपू सुलतानवर विश्वास’!

## अमित शाहांचे विधान, कर्नाटकमध्ये मतदारांना उद्देशून म्हणाले

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

कर्नाटक राज्यात या वर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे. भाजपाने ही निवडणूक जिंकून कर्नाटकमधील आपली सत्ता कायम राखण्यासाठी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. याच कारणामुळे मागील काही दिवसांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच गृहमंत्री अमित शाह कर्नाटकचा सातत्याने दौरा करत आहेत. दरम्यान, कर्नाटकमध्ये असताना अमित शाह यांनी ‘काँग्रेस’ आणि ‘जेडीएस’ला घेरलं आहे. टिपू सुलतान यांचा संदर्भ देत अमित शाहा यांनी काँग्रेसवर टीका केली असून तुम्ही कोणाच्या पाठीमागे उभे राहणार? असा भावनिक सवाल मतदारांना केला आहे. ”




अमित शाह यांनी कर्नाटकमधील एका सहकारी संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांनी भाषण केले. यावेळी “जे लोक १८ व्या शतकातील म्हैसुरचे शासक टिपू सलतान यांच्यावर विश्वास ठेवतात ते कर्नाटकसाठी काहीही चांगले करू शकत नाहीत. आम्ही १६व्या शतकातील राणी तुलुवा यांच्यावर विश्वास ठेवतो,” असे अमित शाह म्हणाले. तसेच काँग्रेस टिपू सुलतान यांच्यावर विश्वास ठेवतो. माग लोकांनी त्यांना मतदान करावे की राणी अबाक्का यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या भाजपाला मतदान करावे? असा सवालही अमित शाह यांनी केला.

### ?

» इंदिरा गांधी नॅशनल सेंटर ऑफ आर्ट्सच्या संकेतस्थळावर अबाक्का यांच्याविषयी माहिती देण्यात आली आहे. या माहितीनुसार अबाक्का यांना कर्नाटकध्ये राणी अबाक्का म्हटले जाते. त्यांना स्थानिक पातळीवर अबाक्का महादेवी असेही म्हटले जाते. त्यांनी पोर्तुगीजांचा प्रतिकार केला, असे म्हटले जाते. आद्य स्वातंत्र्य सैनिकांपैकी त्या एक असल्याचे म्हटले जाते. तुलू नाडूवर त्यांनी राज्य केले होते. त्या छोटवा राजघरण्याच्या वंशज होत्या.

मोदी यांनीही केला होता राणी अबाक्का यांचा उल्लेख

मागील वर्षी सप्टेंबर महिन्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकमध्ये एका सभेला संबोधित करताना राणी अबाक्का यांचा उल्लेख केला होता. राणी अबाक्का यांच्यासह त्यांनी राणी चेन्नाभैरा यांचाही उल्लेख केला होता. या दोन्ही कर्नाटकमधील स्थानिक महिला होत्या. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले होते.

---

# दिल्लीत महापौर, उपमहापौरपदाची १६ फेब्रुवारीला होणार निवडणूक

## वी.के.सक्सेना यांचा निवडणूक प्रत्सावाला ग्रीन सिग्नल

।|नवी दिल्ली। महाईन्यूज ।

दिल्ली महानगरपालिकेतील महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीचे सदस्य पदाच्या निवडणुका १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल वी.के.सक्सेना या निवडणुकांच्या प्रत्सावाला ग्रीन सिग्नल दिला आहे.

महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडीसाठी गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत गोंधळ सुरू आहे. आतापर्यंत अनेकवेळा सभागृहाचं कामकाजही स्थगित करण्यात आलं होतं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी नायब राज्यपाल वी.के.सक्सेना यांच्याकडे निवडणुकांसाठी प्रस्ताव ठेवला होता. त्यानुसार, १३ आणि १४ फेब्रुवारी रोजी महापौर निवडणूक ठेवण्याची मागणी केली होती. मात्र, एमसीडीशी संबंधित एक प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून १३ फेब्रुवारीला सुनावणी आहे. त्यामुळे निवडणूक १६ फेब्रुवारीला होतील, असं वी.के.सक्सेना यांनी स्पष्ट केलं.

### नामनिर्देशित सदस्यांना मतदान करण्याला आपचा आक्षेप

»नायब राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले सदस्यही महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत मतदान करू शकतात, असे सभागृहाचे कामकाज सुरू झाले तेव्हा पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले. हे सदस्य भाजपाच्या पारड्यात मते टाकतील, असा दावा करत आपच्या नगरसेवकांनी विरोध सुरू केला .



महापौर निवडणूक जलद गतीने घेण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालायने नायब राज्यपाल, एमसीडीचे पीठासीन अधिकारी आणि अन्य लोकांकडून उत्तर देण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर, आता १६ फेब्रुवारीला निवडणूक होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.दिल्ली महानगरपालिकेच्या (MCD) महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक ६ फेब्रुवारीला होणार होती. तिसऱ्यांदा ही निवडणूक लागली होती. मात्र, सभागृहाचे कामकाज सुरू होताच गदारोळ झाला. त्यामुळे पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचे कामकाज आधी 10 मिनिटांसाठी तहकूब केले. मात्र, गदारोळ सुरूच राहिल्याने त्यांनी सभागृह अनिश्चित काळासाठी तहकूब केले. अशाप्रकारे दिल्ली महापालिकेच्या महापौरपदाची निवडणूक होऊ शकली नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीने (AAP) सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला होता. ६ फेब्रुवारी रोजी सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वीच आप आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या होत्या.

# ओम अन् अल्लाह एकच...

## जमियत उलेमा-ए-हिंदच्या मंचावर मौलानांचे वक्तव्य

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

जमीयत उलेमा-ए-हिंद चे शेवटचे मौलाना अरशद मदनी यांच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. जमीयत उलेमा-ए-हिंद यांच्या ३४ व्या अधिवेशनात मौलाना अरसद मदनी यांनी आरएसएसचे प्रमुख मोहन भागवत यांच्या वक्तव्यावर टीका केली.

यावेळी बोलताना त्यांनी अल्लाह आणि ओम एकच असल्याचे वक्तव्य केले. त्यानंतर त्यांच्या या वक्तव्याच्या विरोधात अधिवेशनात उपस्थित वेगवेगळ्या धर्माचे धर्मगुरू उठून गेल्याचे देखील पाहायला मिळालं.

मौलाना काय म्हणाले..

मौलाना अर्शद मदनी म्हणाले की, मी धर्मगुरूंना विचारले, जेव्हा कोणीही नव्हते, ना श्रीराम, ना ब्रह्मा, ना शिव होते, तेव्हा प्रश्न तयार होतो की मनु कोणाची पूजा करत? काही लोक म्हणतात की शिव ची पूजा करत. पण खूप कमी लोक सांगतात की मनू ओमची पूजा करत असत. पुढे मौलाना म्हणाले की, मी विचारलं ओम कोण आहे?, तेव्हा बऱ्याच जणांनी सांगितलं की, ओम हवा आहे. ज्याचं कोणतंच रुप, रंग नाही. तर मी म्हटले की आम्ही त्यांनाच आम्ही अल्लाह म्हणतो, तुम्ही देव म्हणता , फारशी बोलणारे खुदा आणि इंग्रजी बोलणारे गॉड म्हणतात. या वक्तव्यामुळे नवा वाद सुरू झाला आहे.

दिल्लीत सुरू असलेले जमीयत उलेमा-ए-हिंदचे अधिवेशन सातत्याने वादात सापडत आहे. काही दिवसांपूर्वीही महमूद मदनी यांनी कार्यक्रमादरम्यान वादग्रस्त वक्तव्य केले होते. इस्लाम हा जगातील सर्वात जुना धर्म असून इस्लामचा जन्म भारतात झाला, असा मोठा दावा त्यांनी केला. त्यांना (हिंदूंना) वाटले की मशिदी पाडून इस्लाम संपेल, पण तसे नाही. जर हृदय स्वीकारत नसेल तर इस्लाम त्याचा असू शकत नाही.



### जेवढा देश मोदी-भागवतांचा, तेवढाच आपला- जमियत

»जमियत उलेमा-ए-हिंदचे प्रमुख महमूद मदनी शनिवारी म्हणाले होते की, भाजप व संघासोबत आमचे धार्मिक नव्हे, तर वैचारिक मतभेद आहेत. दिल्लीच्या रामलीला मैदानावर जमियतच्या 34 व्या अधिवेशनात ते म्हणाले – भारत जेवढा मोदी व भागवत यांचा आहे, तेवडाच मदनींचाही आहे.जमियत चिफ म्हणाले - आमचे संघ व सरसंघचालकांना निमंत्रण आहे. या, भेदभाव व एकमेकांतील वैर विसरुन एकमेकांना अलिंगन देऊया. भारत शक्तिशाली बनवूया. आमची सनातन धर्माविषयी कोणतीही तक्रार नाही. तुम्हालाही इस्लामशी कोणतीही तक्रार असू नये.

# वेलेंटाईन साजरा करा तुम्हाला 'वेड' लावणाऱ्या प्रेमासोबत.. रितेशची खास ऑफर

देशभरात वेलेंटाईन वीक जोमात सुरू आहे. सर्वत्र प्रेमाच वातावरण आहे. प्रेमी लोक आनंदाने आणि तितक्याच उत्साहाने हा दिवस साजरा करत आहेत. आपल्या प्रिय व्यक्तीसोबत वेळ घालवणं सर्वांनाच आवडतं. अशातच अख्या महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या रितेश आणि जेनेलियानेही त्याच्या कडून चाहत्याचा यंदाचा वेलेंटाईन वीक आनंदात साजरा करण्यासाठी स्पेशल ऑफर दिली आहे.

रितेश देशमुख आणि त्याची पत्नी अभिनेत्री जिनिलिया देशमुख यांचा ३० डिसेंबरला रिलीज झालेला 'वेड' हा सिनेमा आता वेलेंटाईन निमीत्त फक्त 99 रुपयांना पहायला मिळणार आहे. होय., रितेशने त्याच्या सोशल मिडियावर पोस्ट शेअर करत याची माहिती दिली आहे. तुमचा वेलेंटाईन डे आणखी स्पेशल बनवा तुमच्या 'वेड' सोबत. वेड फक्त 99 रुपयांमध्ये..आताच तुमच तिकिट बुक करा..रितेशचा दिग्दर्शक म्हणून तर जिनिलियाचा अभिनेत्री म्हणून मराठीतला हा पहिलाच सिनेमा आहे. रितेश व जिनिलीयाच्या 'वेड' बॉक्स ऑफिसवर कमाल केली आहे. वेडने रेकॉर्डतोड कमाई करत सर्वांच्या भूवया उंचावल्या आहेत.या चित्रपटाने प्रेक्षकांना 'वेड'लावलय असं म्हटलंतर वावगं ठरणार नाही. 'वेड' चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.



# प्राजक्ताला मिळाला युवा पुरस्कार, बोलताना शब्द सुचेना झाली भावूक..

मराठीमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी ही नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असते. लोकप्रिय अभिनेत्री, डान्सर, निवेदिका प्राजक्ता माळी हिचं प्रचंड फॅन फॉलोइंग आहे. तिचा सिनेमा असो किंवा वैयक्तिक आयुष्यातील काही घडामोडी, ती सतत प्रकाशझोतात असते. नुकतच तिने प्राजक्तराज हा तिचा ज्वेलरी ब्रॅण्डही सुरु केला आहे. ती महाराष्ट्राची क्रश म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.

नुकतच प्राजक्ताने सोशल मीडियावर तिच्या आयुष्यातली एक महत्वाचा क्षण तिच्या चाहत्यांसोबत शेयर केला आहे. तिला सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'युवा पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आलं. याबद्दल पोस्ट शेअर करत तिने मान्यवरांचे आभार मानले आहे.

तिने तिच्या सोशल मिडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये ती लिहिते, 'पुणे शहरात वाढले, सगळं शिक्षण पुण्यात झालं, पुणे विद्यापीठातून पदवीधर झाले... त्यामुळे घरातून शाबासकी मिळाल्याची भावना आहे... ह्यात "ललित कला केंद्र-गुरुकुल- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ",

'माझे नृत्य गुरुद्वय- गुरू श्रीमती स्वातीताई दातार, गुरू श्री. परिमल फडके, माझं कुटूंब, माझी प्राथमिक शाळा - समर्थ विद्यालय, माध्यमिक शाळा - दामले प्रशाला-महाराष्ट्र मंडळ, पुणे शहर, प्राजक्तप्रभा, प्राजक्तराज, आतापर्यंत केलेल्या सगळ्या मालिका, चित्रपट, विशेषकरून महाराष्ट्राची हास्यजत्रा, ART OF LIVING FOUNDATION- श्री श्री रवीशंकरजी आणि "माझा अत्यंत प्रामाणिक असा प्रेक्षकवर्ग" ह्या सगळ्यांचा सहभाग आहे..'



# 'रविनाला पद्मश्री देणं म्हणजे...'



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री रविना टंडन गेल्या तीन दशकांहून अधिक काळ मनोरंजन विश्वामध्ये सक्रिय आहे. तिनं आपल्या सौंदर्यानं, अभिनयानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून रविना ही वादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे दिसत आहे. त्याचे कारण तिला जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार. यानंतर तिच्यावर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

२५ जानेवारीला भारत सरकारनं पद्मश्री पुरस्कारांची घोषणा केली. त्यामध्ये रविनाचेही नाव होते. ते ऐकल्यानंतर काही नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका केली आहे. रविनाला पद्मश्री पुरस्कार देण्यात काय हेतू आहे, तिला का पुरस्कार दिला जात आहे, मनोरंजन विश्वात तिनं अशी काय कामगिरी केली आहे असे अनेक प्रश्न यावेळी नेटकऱ्यांकडून विचारण्यात आले होते. यंदाच्या पुरस्कार्थींच्या यादीत पद्मश्री जाहीर झालेली रविना ही एकमेव अभिनेत्री ठरली आहे. रविना टंडनला साहित्य क्षेत्रामध्ये विशेष योगदान दिल्याप्रकरणी सन्मानित केलं गेलं आहे. त्यानंतर प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेता, समीक्षक कमाल राशिद खाननं प्रतिक्रिया दिली आहे. त्यानं रागात रविनानं हल्लाबोल केला आहे. केआरकेचं ते ट्विट सोशल मीडियावर व्हायरल झाले असून त्यानं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# एक नारी थी सबपर भारी! प्रियंका चहर चौधरीचं स्वप्न भंगलं..

टीव्हीचा सर्वात वादग्रस्त आणि लोकप्रिय रिॲलिटी शोने बिग बॉस 16 गेल्या 4 महिन्यांपासून सर्वांचे जोरदार मनोरंजन केले. आज या शोचा शेवटा दिवस मोठ्या उत्साहात पार पडत आहे. बिग बॉस 16 मध्ये मोठा गोंधळ झाला आहे, घरातून बाहेर काढण्यात आलेल्या एमसी स्टॅनला घरामध्ये परत पाठवण्यात आले आहे आणि प्रियंका चहर चौधरीला बाहेर काढण्यात आले आहे.

प्रियंकाने तिच्या प्रेमळ स्वभावाने चाहत्यांची मने जिंकली आणि त्याच्या मतांमुळेच तिला या शोची विनर होणार अशी आशा चाहत्यांना होती मात्र तस झालेलं नाही. आता घरात शिव ठाकरे आणि एमसी स्टॅन हे उरले आहे. प्रियंका घरात ऐकटीच सर्वांना भिडली. तिने एकटीने स्वबळावर हा गेम तर सर्वांची मनेही जिंकली.प्रियंका बद्दल बोलायचं झालं तर तिला सोशल संभाव्य विजेता म्हणून घोषित केलेलं होत. यावर्षीच्या सीझनमध्ये सर्वाधिक प्रबळ दावेदार म्हणून प्रियंका दिसली. परफॉर्मन्सवर कौतूकाचा वर्षावही बॉसनेही स्वत: तिला एक धाडसी, स्पष्टवक्ती आणि खूप आत्मविश्वासू प्रियंका चहर चौधरीची ही या घरातील सर्वात हुशार मुलगी आहे खेळलाच नाही मीडियावर अनेकांनी प्रभावशाली आणि केला गेला. बिग स्पर्धक बोललं होत. आणि लीडर होती. त्यामुळं चाहत्यांची चाहते आता धारेवर धरत ती आता या सिझनची विजेती होता होता राहिली प्रियंकाचे बिग बॉसला निराशा झाली. आहे.



# रॉड्रिग्जचं अर्धशतक, ऋचाची फटकेबाजी!

## भारताचा पाकिस्तानवर 7 विकेट्सनं विजय, पाकिस्तानच्या तोंडून विजयाचा घास हिरावला

**। नागपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारतीय महिला संघाने पाकिस्तानचा सात विकेट्सनी पराभव करत टी 20 विश्वचषकात विजयी सुरुवात केली. पाकिस्तानने दिलेले 150 धावांचे आव्हान भारतीय संघाने एक षटक आणि सात विकेट्स राखून आरामात पार केले. जेमिमा रॉड्रिग्ज हिने अर्धशतकी खेळी करत पाकिस्तानच्या तोंडून विजयाचा घास हिरावला. ऋचा घोष हिने 31 धावांची खेळी करत चांगली साथ दिली. पाकिस्तानकडून नशरा संधू हिने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. पाकिस्तानच्या कर्णधाराची 68 धावांची खेळी व्यर्थ ठरली. जेमिमा रॉड्रिग्ज हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.**

पाकिस्तानने दिलेलं 150 धावांचं आव्हानाचा पाठलाग करताना शफाली वर्मा आणि यस्तिका भाटिया यांनी आक्रमक सुरुवात करुन दिली. पण 38 धावांवर यस्तिका भाटिया हिच्या रुपाने भारताला पहिला धक्का बसला. यस्तिका हिने 17 धावांची खेळी केली. त्यानंतर जेमिमा आणि शफाली वर्मा यांनी भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण संधूने शफालीला बाद करत भारताला दुसरा धक्का दिला. शफाली वर्मा 33 धावांवर बाद झाली. त्यनंतर जेमिमा हिने कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत भागिदारी करत विजयाकडे आगेकूच केली होती. पण पुन्हा एकदा संधू हिने विकेट घेत भारताला धक्का दिला. हरमनप्रीत कौर 16 धावा काढून तंबूत परतली. हरमनप्रीत बाद झाल्यानंतर भारतीय संघाच्या अडचणी वाढल्या होत्या.. पण जेमिमा आणि ऋचा घोष यांनी




संयमी अन् तितकीच आक्रमक फलंदाजी केली. अखेरच्या चार षटकात 41 धावांची गरज होती. त्यावेळी दोघींनी वादळी खेळी केली. दोघांनी अवघ्या तीन षटकात 41 धावांचा पाऊस पाडला. 17 व्या षटकात ऋचा घोष हिने सलग तीन चौकार लगावत पाकिस्तानच्या तोंडूव विजय हिसकवला. जेमिमाने 19 षटकात राहिली सुरली कसर पूर्ण केली. ऋचा घोष आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी चौथ्या विकेटसाठी 33 चेंडूत 58 धावांची नाबाद भागीदारी केली. जेमिमाने 53 धावांच्या खेळीत 8 चौकार लगावले. तर ऋचा घोष हिने 31 धावांच्या छोटेखानी खेळीत पाच चौकारांचा पाऊस पाडला.

दरम्यान, पाकिस्तानची कर्णधार बिस्मा मारूफ हिने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण भारतीय गोलंदाजांनी तो निर्णय चुकीचा ठरवत अवघ्या दहा धावांवर पहिली विकेट घेतली. पण त्यानंतर बिस्मा मारूफ हिने कर्णधाराला साजेशी फलंदाजी करत अर्धशतक झळकावलं. बिस्मा मारूफने मोक्याच्या क्षणी संयमी आणि तितकीच आक्रमक फलंदाजी करत पाकिस्तानची धावसंख्या वाढवली.. बिस्मा मारूफ आणि आयशा नसीम यांच्या अर्धशतकी भागादारीच्या जोरावर पाकिस्तान संघाने 20 षटकांत 149 धावांपर्यंत मजल मारली. बिस्मा मारूफ हिने 55 चेंडूत सात चौकारांसह 68 धावांची खेळी केली. एका बाजूला विकेट पडत असताना बिस्मा हिने दुसरी बाजू लावून धरली. बिस्मा मारूफ आणि आयशा नसीम या दोघींपुढे भारतीय गोलंदाजांनी गुडघे टेकले. दोघींनी 47 चेंडूत नाबाद 81 धावांची भागिदारी केली. या भागिदारीच्या जोरावर पाकिस्तानचा संघ 149 धावांपर्यंत पोहचला. आयशा नसीम हिने 25 चेंडूत झटपट 43 धावांची खेळी केली. भारताकडून राधा यादव हिने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. दिप्ती शर्मा आणि पूजा वस्त्रकर यांनी प्रत्येकी एक एक बळी घेतला. यांच्याशिवाय इतर गोलंदाजांनाही एकही बळी घेता आला नाही.

# वेदांतने पाच सुवर्णपदकं जिंकली

## लेकाच्या कामगिरीनं भारावला आर माधवन



**।नागपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

खेलो इंडिया या स्पर्धेत अभिनेता आर. माधवन याचा मुलगा वेदांत यानं सुवर्ण कामगिरी केली आहे. वेदांत याने या स्पर्धेत पाच सुवर्ण व दोन रौप्य अशी एकूण सात पदके जिंकली. अभिनेता आर. माधवन यानं ट्वीट करत आपल्या लेकाचं कौतुक केले आहे.

महाराष्ट्राने खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या पाचव्या पर्वात 161 (56,55,50) पदकांसह सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. महाराष्ट्राने तिसऱ्यांदा या स्पर्धेत विजेतेद पटकावले. यापूर्वी 2019 पुणे आणि 2020 आसाम येथेही महाराष्ट्राने विजेतेपद पटकावलं होतं. वेदांत माधवन यानं उत्कृष्ट कामगिरी करत पाच दिवसांत सात पदकं जिंकली आहेत. यामध्ये पाच सुवर्ण आणि दोन रौप्य पदकांचा समावेश आहे. आर. माधवन यानं ट्वीट करत आपल्या लेकाचं कौतुक केले आहे. माधवन याने स्वतःच्या मुलासोबतच या स्पर्धेत अव्वल कामगिरी करणाऱ्या अपेक्षा फर्नांडिस हिचेही कौतुक केलेय. त्यासोबतच कोच आणि इतर स्टाफचं कौतुक करायला माधवन विसरला नाही. वेदांत याने तिसऱ्या दिवशी दोन सुवर्ण व एक रौप्य पदकाची कमाई केली. शंभर मीटर्स फ्री स्टाईल शर्यतीत सोनेरी कामगिरी करताना त्याने 52.97 सेकंद अशी वेळ नोंदवली. त्याने या शर्यतीत सुरुवातीपासूनच साधारणपणे वीस ते पंचवीस मीटरची आघाडी घेतली होती. त्याला चारशे मीटर्स फ्री स्टाईल शर्यतीत मात्र सोनेरी यशाने हुलकावणी दिली. ही शर्यत त्याने चार मिनिटे 09.61 सेकंदात पार करीत रौप्य पदक पटकाविले. चौथ्या दिवशी मुलांच्या आठशे मीटर्स फ्री स्टाईल शर्यतीत वेदांत माधवन याचे सुवर्णपदक हुकले.

### वेदांतचा खेलो इंडियात जलवा, 7 पदके कशी जिंकली?

**जलतरण स्पर्धेच्या पहिल्या दिवसाची सुरुवातच वेदांत याने मिळविलेल्या सुवर्णपदकाने झाली होती. वेदांत याने 200 मीटर फ्रीस्टाईलचे अंतर एक मिनिट 55.39 सेकंदात पार केले होते. गतवर्षी डॅनिश खुल्या स्पर्धेत एक सुवर्ण व एक रौप्य पदक मिळवणाऱ्या वेदांतने येथे सुरुवातीपासूनच फ्रीस्टाईलचे अप्रतिम कौशल्य दाखवीत ही शर्यत सहज जिंकली. वेदांत हा प्रसिद्ध अभिनेता आर. माधवन यांचा मुलगा असून त्याने जलतरणातच करिअर करण्याचा निर्णय घेतला होता. त्याला सुरुवातीपासून त्याच्या पालकांकडून सातत्याने सहकार्य मिळाले आहे. वेदांत माधवन याने दुसरे सुवर्णपदक नोंदविताना पंधराशे मीटर फ्री स्टाईल शर्यतीत निर्विवाद यश मिळविले. वेदांत याने दुसऱ्या दिवशी पंधराशे मीटर्स शर्यतीत पहिल्यापासूनच आघाडी घेत सहजपणे विजेतेपद पटकाविले. त्याला हे अंतर पार करण्यास 16 मिनिटे 16.74 सेकंद वेळ लागला.**

# हार्दिक पांड्या पुन्हा चढणार बोहल्यावर

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारताच्या संघातून मोठी अपडेट समोर आली आहे. भारताचा धडाकेबाज क्रिकेट हार्दिक पांड्या पुन्हा बोहल्यावर चढणार असल्याची माहिती समोर आली आहे. पांड्या सध्या ब्रेकवर आहे. त्यामुळे क्रिकेट वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. पांड्या पुन्हा कोणासोबत लग्नगाठ बांधतोय असा सवाल उपस्थित होत आहे.

हार्दिक पांड्याने २०२० मध्ये अभिनेत्री नताशा स्टॅनकोविकसोबत कोर्ट मॅरेज केले होते. त्या दोघांना अगस्त नावाचा एक मुलगाही आहे. दोघे पुन्हा आता लग्न करणार असल्याची माहिती समोर आली आहे. हार्दिक पांड्या आणि नताशा स्टॅनकोविक पुन्हा एकमेकांशी लग्न करणार आहेत. एका हिंदी वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, हे जोडपे १४ फेब्रुवारीला उदयपूरमध्ये एका भव्य समारंभात पुन्हा एकदा सात फेरे घेतील.हार्दिक पांड्या आणि नताशा स्टॅनकोविच यांचा विवाह सोहळा १३ फेब्रुवारीपासून



सुरू होणार असून १६ पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमात हळद, मेहंदी आणि संगीत असे कार्यक्रम होणार आहेत.

**हार्दिक आणि नताशाची अशी झाली भेट**

एका नाईट क्लबमध्ये आमची भेट झाली होती. तिला माहिती नव्हतं की मी कोण आहे? एकमेकांशी बोलता बोलता भेटीचं रुपांतर ओळखीत झालं. जेव्हा आम्ही पहिल्यांदा भेटलो तेव्हा मी हॅट घातली होती. रात्री एक वाजता हॅट घालून, गळ्यात चैन आणि हातात घड्याळ घालून बसलो होतो.

तेव्हा तिला मी थोडा विचित्र वाटलो. पण आम्ही आमचं बोलणं सुरुच ठेवलं. त्यानंतर खऱ्या अर्थाने एकमेकांना ओळखू लागलो आणि डेट करणं सुरु केलं.